/

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** सांगली शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0169 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/04/2025 03:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 16/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/04/2025
**Time From (वेळेपासून):** 15:42 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/04/2025 **Time (वेळ):** 02:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/04/2025 02:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सांगली शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री विकास बाळासो शिंदे
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** बाळासो शिंदे
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बांवडे,तापलुस जिसांगली,बांवडे,तापलुस जिसांगली,सांगली शहर,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बांवडे,तापलुस जिसांगली,बांवडे,तापलुस जिसांगली,सांगली शहर,सांगली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8856828181

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन उषा संपत उबाळे | | वडील का नाम : उषा संपत उबाळे | 1. खरे क्लब हाऊस साफल्य बंगला विश,खरे क्लब हाऊस साफल्य बंगला विश,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दीजबाब दि 18/04/2025

मी श्री विकास बाळासो शिंदे वय 30वर्षे व्यवसाय-खाजगी नोकरी(व्यवस्थापक-संकल्प महीला बचत गट) रा. बांवडे,ता.पलुस जि.सांगली मो.नं 8856828181

मी वरील ठीकाणी माझे कुटुंबियासह राहणेस आहे. माझे नातेवाईक(मामी) सौ सुनिता दौलतराव घोरपडे यांनी सन 2010 साली संकल्प महीला बचत गट,कलानगर सांगली याची स्थापना केली असुन त्या सदर गटाचे अध्यक्षा आहेत. मी सन 2013पासुन संकल्प महीला बचत गट सांगली यांनी घेतलेल्या टेंडरचे व्यवस्थापन करण्याचे काम करीत असतो.

आमचे संकल्प महीला बचत गटास समाज कल्याण विभाग सांगली यांचे मार्फे शासकीय निवासी शाळांमधील विद्याथ्याच्या जिल्हास्तरीत व विभागियस्तरीत क्रिडा व सांस्कृतीक कार्यक्रम अंतर्गत जिल्हा क्रिडा संकुल सांगली येथे दि 05.01.2025 ते 09.01.2025 या दरम्यान सहभागी अधिकारी ,कर्मचारी व विद्यार्थी यांना नाष्टा व भोजन पुरविण्याचे टेंडर प्रप्त झाले होते. त्यावेळी आमचे संकल्प महीला बचत गट, कलानगर सांगली यांनी वरील कार्यक्रमा दरम्यान सहभागी अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी व इतर स्टाफ यांना नाष्टा व भोजन पुरविले असुन त्याचे संपुर्ण व्यवस्थापनाचे काम मी पाहीले आहे.

त्यानंतर आम्ही केले कामाचे बिलासाठी मी व माझे मामा श्री दौलतराव शंकरराव घोरपडे असे समाज कल्याण विभाग सांगली येथे जावुन श्री उबाळे साहेब यांचेकडे पाठपुरावा करीत होतो. त्यावेळी श्री उबाळे,सहाय्यक आयुक्त यांनी आमचे बिल मंजुर करण्यासाठी आमच्याकडे 10टक्के प्रमाणे पैशैचे मागणी केली होती.

दि 04.04.205 रोजी समाज कल्याण विभाग सांगली यांनी आम्ही केलेल्या वरील कामाचे एकुण बिल रक्कम रूपये 8,12,292/-पैका कर वजा जाता रक्कम रूपये 7,96,045/- असे संकल्प महीला बचतगट सांगली यांचे नावे बँक खातेवर जमा केले होते.

त्यानंतर दि 07.04.2025 रोजी श्री उबाळे सहायय्क आयुक्त यांनी मला व माझे माम श्री दौलतराव घोरपडे यांनी त्यांचे कार्यालयामध्ये बोलावुन घेवुन बिल मंजुर केलेचे मोबदल्यात आमचेकडे पुन्हा 10 टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली होती. त्यांनतर पुन्हा दि 11.04.2025 रोजी श्री उबाळे, सहाय्यक आयुक्त यांचा मला मिस कॉल आल्याने मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला कार्यालयात भेटण्यास बोलाविले होते. परंतु उबाळे साहेब माझ्याकडे पैशाची मागणी करतील या भितीने मी त्यांचेकडे गेलो नव्हतो. मला श्री उबाळे सहाय्यक आयुक्त यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि 16.04.2025 रोजी सकाळी 11.07 वा चे सुमारास पोलीस उपअधीक्षक श्री उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो,सांगली यांना फोनव्दारे संपर्क करून माझी श्री उबाळे,सहायय्क आयुक्त समाज कल्याण सांगली यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला सांगली येथील बायपास रोड येथील वृंदावन मंगल कार्यालय येथे 12.30 वा हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दि 16.04.2025 रोजी 12.30वा चे सुमारास सांगली येथील बायपास रोड येथील वृंदावन मंगल कार्यालय येथे जावुन पोलीस उपअधीक्षक श्री उमेश पाटील,अँन्टा करप्शन ब्युरो सांगली यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहीती देवुन मला तक्रीर अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी श्री उबाळे,सहायय्क आयुक्त समाज कल्याण सांगली यांचे विरूध्दचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज व बिला संदर्भातील कागदपत्रांचेया झेरॉक्स पाटील साहेबांच्या समक्ष हजर केला.मी दिले तक्रारी अर्जावर पाटील साहेब यांनी वाचुन सही केली त्यानंतर पाटील साहेब यांनी त्यांचे सोबत असेल दोन शासकीय पंचांची व सापळा पथकांची ओळख करून दिली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं 1म्हणुन श्री अजिंक्य भैराप्पा शिंदे यांनी व पंच नं 2म्हणुन श्री भिमा शंकर विष्णु निळे यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यांनतर पाटील साहेब यांनी दिले



Scanned with OKEN Scanner

सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्हा पंचासमक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज व बिला संदर्भातील कागदपत्रांच्या झेरॉक्स पंचाना वाचण्यास दिली. पंचांनी तक्रारी अर्ज वाचुन सांगितलेली तक्रार व तक्रारी अरेजातील मजकुर एकच असलेचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर व बिला संदर्भातील कागदपत्रांच्या झेरॉक्सवर सह्या केल्या.

त्यांनतर श्री श्री उबाळे,सहाय्यक आयुक्त यांचा ठावठीकाणा निश्चित करण्यासाठी माझे मोबाईल वरून उबाळे साहेब यांचे मोबाईलवर कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यांनतर पाटील साहेब यांनी मला व पंचाना डीजीटल वॉईस रेकॉर्डर दाखवुन त्यांचे कार्य पध्दतीबाबत माहीती देवुन त्यामध्ये एक नविन मेमरी कार्ड घातले त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल वरून उबाळे साहेब यांचे मोबाईल नं 8329553865 वर 13.35 वा चे सुमारास पंचा समक्ष कॉल केला असता मी त्यांना "नमस्कार साहेब विकास बोलतोय" असे म्हणुन सांगलीला आलो असलेचे सांगुन ऑफासला येवु दे का अशी विचारणा केली त्यावर उबाळे साहेब यांनी मला थोड्या वेळाने फोन करीत असल्याचे सांगुन फोन कट केला सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केला आहे.

बराचवेळ झाला तरी उबाळे साहेब यांचा फोन न आलेने पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी पुन्हा माझे मोबाईलवरून उबाळे साहेब यांचे मो.नं 8329553865 वर 15.21 वा चे सुमारास पंचा समक्ष कॉल केला असता उबाळे साहेब यांनी मला ऑफीसला येण्यास सांगुन सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 शिंदे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हईस रेकॉर्डर 15.42 वा सुरू करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 अजिंक्य शिंदे असे माझेकडील सुझीकी अँक्सेस मो.सा.क्र.एम.एच10सीजे6200 वरून रवाना होवून समाज कल्याण सांगली येथे दाखल झालो.त्यावेळी मी कार्यालयातील कर्मचारी यांना उबाळे यांचेबाबत विचारणा केली असता त्यानी उबाळे साहेब त्याचे केबीनमध्ये असल्यांचे सांगितले.

त्यानंतर मी व पंच नं.1 शिंदे असे मिळून जावून ऊबाळे साहेब याची त्याचे कक्षामध्ये जावून भेट घेतली त्यावेळी ऊबाळे साहब यांनी मला "आणलय का काय?" असे म्हणून पैसे आणलेत का? याबाबत विचारणा केलीत्यावर मी त्याना "न्हाय अत्ता काय न्हाय,अधी ते बोलले साहेबाच्याकडे जा बील आपले जमा होवून बरेच दिवस झालेसाहेबांना भेटून ये म्हणून सागितले" असे म्हणालो त्यावर ऊबाळे साहेब यानी मला" मग भेटून काय करायच नुसत" असे म्हणुन हाताने इशारा करून "हे....हे किती? कस करणार हाय अता?" असे म्हणुन पुन्हा पैशाबाबत विचारणा केली. त्यवर मी ऊबाळे साहेब यांना"मामा बोलले की कस करायच, काय करायच एकदा विचारून ये म्हणून सांगितले" असे म्हणालो. त्यावर उबाळे साहेब यांनी "तुम्हाला माहिती हाय दरवेळ चे काय नविन हा का हे.... नेहमीच्या पद्धतीने" असे म्हणून"मीच दहा टक्के मागणार होतो असे म्हणालो. त्यावर मी त्याना बील यायाला वेळ झाला असलेचे सांगितले.

त्यानंतर ऊबाळे साहेब यांनी मला त्याचे टेबलवरील नोटपॅंडटे कागदावर "5 टक्के " असे लिहून "हे बघ " असे महणून मला दाखविले त्यावर मी त्यांना "5 टक्के" असे विचारले असता ऊबाळे साहेब "हो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "पाच टक्केन साहेब .... चाळीस हजार होत्यात" असे म्हणालो. त्यावर उबाळे साहेब यांनी नोटपॅंड चा कागद फाडून टाकून मला "मग कस करायच "असे विचारले.त्यावर मी त्यांना "घेवून येवू काय,काय करू.... जावून काढून आणतो लगेच"असे विचरले असता ऊबाळए साहेब यांनी "दे....तुझी तब्बेत न्हाय ना बरोबर.. बग तुझ्या तब्बेतीने बग" असे म्हणून लागलीच पैसे घेवून येण्यास सांगितले त्यावर मी त्यांना "या म्हणालतर घेवून येतो, ऊद्या म्हणालतर ऊद्या करतो तस काय सुद्धा न्हाय"असे म्हणालो. त्यावर उबाळे साहेब यांनी" ऊद्या दे " असे म्हणाले असता मी "ओके.... येतो मग उद्याच" असे म्हणून त्याचे कक्षामधून मी व पंच नं.1 असे बाहेर आलो.सदर बोलणे पंच.नं1 अजिंक्य शिंदे यांनी स्वत: ऐकले आहे.त्यानंतर मी व पंच नं.1 तेथून माझे कडील सुझूकी एँक्सेस मो.सा.क्र.MH.10.CJ.6200 वरून रवाना होवून पाटील साहेव व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिझीटल व्हाईस रेकॉर्डर 15.58वा काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं 1 अजिंक्य शिंदे यांना पडताळणिची हकिकत विचारूण तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डिग ऐकून झालेल्या संभाषणाची पंचासमक्ष खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्री अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी श्री.ऊबाळे,सहा.आयुक्त,समाज कल्याण सांगली यांचेकडील केले पडताळणी कारवाईमध्ये श्री.ऊबाळे,सहा.आयुक्त,समाज कल्याण सांगली यांनी आमचे संकल्प महिला बचत गट यास समाज कल्याण विभाग सांगली यांचे मार्फत शासकीय निवासि शाळा मधिल



Scanned with OKEN Scanner

विद्यार्थीयांच्या जिल्हास्तरीय व विभाग स्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल सांगली येथे दि.05.01.2025 ते 09.01.2025 या दरम्यान सहभागि अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांना नाष्टा व भोजन पुरविणेचे टेन्डरचे बिल मंजुर केलेचे मोबदल्यात पंचासमक्ष माझ्याकड़ एकून टेंन्डरचे बिल रक्कम रूपये 8,12,290 रूपये बिल रकमेच्या 10 टक्के प्रमाणे लाचेची मागणी करून तडजोडी अंती बिल रकमेची पाच टक्के प्रमामे राऊंड फिगर रक्कम 40,000 रूपये लाचेची मागणी करून लाच रक्काम दि.17.04.2025 रोजी घेवून येण्यास सांगिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे दाखल होवून पाटील साहेब यांनी पुढील कार्यवाहि पुर्ण केली त्यानंतर पाटील साहेबांनी श्री.ऊबाळे,सहा..आयुक्त यांचे विरूद्ध दि.17.04.2025 रोजी सापळा कारवाई आयोजित करणेचे निश्चित करून मला दि.17.4.2025 रोजी सकाळी 11.00 वा. बायपास रोडयेथील वृंदावन मंगल कार्यालय येथे लाच म्हणून द्याव्या लागणा-या 40,000 रकमेसह हजर राहण्याच्या व झाल्या कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवून जाण्यास सांगितले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि.17.4.2025 रोजी मी सकाळी 11.45 वा चे सुमारास सांगली बायपास रोड येथिल वृंदावन मंगल कार्यालय येथे जावून पाटील साहेब व सापळा पथक यांची भेट घेतली त्यानंतर पाटील साहेबानी श्री. ऊबाळे,सहा. आयुक्त,यांनी मांगितल्याप्रमाणे त्यांना द्यावे लागणारी लाच रक्कम 40,000रू हजर करणेस सांगितले.त्याप्रमाणे मी 500/- रू दराच्या 80 नोटी असे असे 40,000/-रू पाटील साहेब व दोन्ही पंचासमक्ष हजर केले. त्यावेळी पाटील साहेब यांनी सापळा पथकातील कर्मचारी यांचे करवी लाच रकमेच्या नोंटांचे नं.एका को-या कागदावर लिहून धिवून सदर कागदावर पाटील साहेब, दोन्ही पंच व मी सही केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचाना डीजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हाईलेट दिवा यांची माहीती देवुन त्याचे कार्य पध्दती बाबत माहीती दिली.

त्यांनतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार मकानदार यांचे करवी अँथ्रासिन पावडर लावुन 40,000/- रूपयांचा नोटांचा बंडल माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवला व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांनी सापळा कारवाईच्या अनुशंघाने योग्या त्या सुचना दिल्या त्यांनतर पाटील साहेहब यांनी पथकातील अंमलदार मकानदार यांना वृंदावन मंगल कार्यालय येथे थांबण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पाटील साहेब यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर 14.05 वाजता सुरू करून त्यास असले लेस व्दारे माझे गळ्यामध्ये अडकवुन माझे शर्यच्या आतमध्ये सोडले त्यानंतर मी पंच नं 1शिंदे असे माझे कडील सुझुकी अँक्सेस मोपेड क्रमांक MH-10-CJ-6200 वरून वृंदावन मंगल कार्यालय येथुन रवाना झालो.माझे पाठोपाठ पाटी रवाना होवून समाज कल्याण सांगली येथे दाखल झालो.त्यावेळी मी कार्यालयातील कर्मचारी यांना उबाळे यांचेबाबत विचारणा केली असता त्यानी उबाळे साहेब त्याचे केबीनमध्ये असल्यांचे सांगितले.

त्यानंतर मी व पंच नं.1 शिंदे असे मिळून जावून ऊबाळे साहेब याची त्याचे कक्षामध्ये जावून भेट घेतली त्यावेळी ऊबाळे साहंब यांनी मला "आणलय का काय?" असे म्हणून पैसे आणलेत का? याबाबत विचारणा केलीत्यावर मी त्याना "न्हाय अत्ता काय न्हाय,अधी ते बोलले साहेबाच्याकडे जा बील आपले जमा होवून बरेच दिवस झालेसाहेबांना भेटून ये म्हणून सागितले" असे म्हणालो त्यावर ऊबाळे साहेब यानी मला" मग भेटून काय करायच नुसत" असे म्हणुन हाताने इशारा करून "हे....हे किती? कस करणार हाय अता?" असे म्हणुन पुन्हा पैशाबाबत विचारणा केली. त्यवर मी ऊबाळे साहेब यांना"मामा बोलले की कस करायच, काय करायच एकदा विचारून ये म्हणून सांगितले" असे म्हणालो. त्यावर उबाळे साहेब यांनी "तुम्हाला माहिती हाय दरवेळ चे काय नविन हा का हे.... नेहमीच्या पद्धतीने" असे म्हणून"मीच दहा टक्के मागणार होतो असे म्हणालो. त्यावर मी त्याना बील यायाला वेळ झाला असलेचे सांगितले.

त्यानंतर ऊबाळे साहेब यांनी मला त्याचे टेबलवरील नोटपँडटे कागदावर "5 टक्के " असे लिहून "हे बघ " असे महणून मला दाखविले त्यावर मी त्यांना "5 टक्के" असे विचारले असता ऊबाळे साहेब "हो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "पाच टक्केन साहेब .... चाळीस हजार होत्यात" असे म्हणालो. त्यावर उबाळे साहेब यांनी नोटपँड चा कागद फाडून टाकून मला "मग कस करायच "असे विचारले.त्यावर मी त्यांना "घेवून येवू काय,काय करू.... जावून काढून आणतो लगेच"असे विचरले असता ऊबाळए साहेब यांनी "दे....तुझी तब्बेत न्हाय ना बरोबर.. बग तुझ्या तब्बेतीने बग" असे म्हणून लागलीच पैसे घेवून येण्यास सांगितले त्यावर मी त्यांना "या म्हणालतर घेवून येतो, ऊद्या म्हणालतर ऊद्या करतो तस काय सुद्धा न्हाय"असे म्हणालो. त्यावर उबाळे साहेब यांनी" ऊद्या दे " असे म्हणाले असता मी "ओके.... येतो मग उद्याच" असे म्हणून त्याचे कक्षामधून मी व पंच नं.1 असे बाहेर आलो.सदर बोलणे पंच.नं1 अजिंक्य शिंदे यांनी स्वत: ऐकले आहे.त्यांनतर मी व पंच नं.1 तेथून माझे कडील सुझूकी ऍक्सेस



Scanned with OKEN Scanner

मो.सा.क्र.MH.10.CJ.6200 वरून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिझीटल व्हाईस रेकॉर्डर 15.58वा काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं 1 अजिंक्य शिंदे यांना पडताळणिची हकिकत विचारूण तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डिंग ऐकून झालेल्या संभाषणाची पंचासमक्ष खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी श्री.ऊबाळे,सहा.आयुक्त,समाज कल्याण सांगली यांचेकडील केले पडताळणी कारवाईमध्ये श्री.ऊबाळे,सहा.आयुक्त,समाज कल्याण सांगली यांनी आमचे संकल्प महिला बचत गट यास समाज कल्याण विभाग सांगली यांचे मार्फत शासकीय निवासि शाळा मधिल विद्यार्थीयांच्या जिल्हास्तरीय व विभाग स्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल सांगली येथे दि.05.01.2025 ते 09.01.2025 या दरम्यान सहभागि अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांना नाष्टा व भोजन पुरविणेचे टेन्डरचे बिल मंजुर केलेचे मोबदल्यात पंचासमक्ष माझ्याकड् एकून टेंन्डरचे बिल रक्कम रूपये 8,12,290 रूपये बिल रकमेच्या 10 टक्के प्रमाणे लाचेची मागणी करून तडजोडी अंती बिल रकमेची पाच टक्के प्रमामे राऊंड फिगर रक्कम 40,000 रूपये लाचेची मागणी करून लाच रक्काम दि.17.04.2025 रोजी घेवून येण्यास सांगिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे दाखल होवून पाटील साहेब यांनी पुढील कार्यवाहि पुर्ण केली त्यानंतर पाटील साहेबांनी श्री.ऊबाळे,सहा..आयुक्त यांचे विरूद्ध दि.17.04.2025 रोजी सापळा कारवाई आयोजित करणेचे निश्चित करून मला दि.17.4.2025 रोजी सकाळी 11.00 वा. बायपास रोडयेथील वृंदावन मंगल कार्यालय येथे लाच म्हणून द्याव्या लागणा-या 40,000 रकमेसह हजर राहण्याच्या व झाल्या कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवून जाण्यास सांगितले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि.17.4.2025 रोजी मी सकाळी 11.45 वा चे सुमारास सांगली बायपास रोड येथिल वृंदावन मंगल कार्यालय येथे जावून पाटील साहेब व सापळा पथक यांची भेट घेतली त्यानंतर पाटील साहेबानी श्री. ऊबाळे,सहा. आयुक्त,यांनी मांगितल्याप्रमाणे त्यांना द्यावे लागणारी लाच रक्कम 40,000रू हजर करणेस सांगितले.त्याप्रमाणे मी 500/- रू दराच्या 80 नोटी असे असे 40,000/-रू पाटील साहेब व दोन्ही पंचासमक्ष हजर केले. त्यावेळी पाटील साहेब यांनी सापळा पथकातील कर्मचारी यांचे करवी लाच रकमेच्या नोंटांचे नं.एका को-या कागदावर लिहून घिवून सदर कागदावर पाटील साहेब, दोन्ही पंच व मी सही केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचाना डीजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हाईलेट दिवा यांची माहीती देवुन त्याचे कार्य पध्दती बाबत माहीती दिली.

त्यांनतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार मकानदार यांचे करवी अँथ्रासिन पावडर लावुन 40,000/- रूपयांचा नोटांचा बंडल माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवला व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांनी सापळा कारवाईच्या अनुशंघाने योग्या त्या सुचना दिल्या त्यांनतर पाटील साहेहब यांनी पथकातील अंमलदार मकानदार यांना वृंदावन मंगल कार्यालय येथे थांबण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पाटील साहेब यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर 14.05 वाजता सुरू करून त्यास असले लेस व्दारे माझे गळ्यामध्ये अडकवुन माझे शर्यच्या आतमध्ये सोडले त्यानंतर मी पंच नं 1शिंदे असे माझे कडील सुझुकी अँक्सेस मोपेड क्रमांक MH-10-CJ-6200 वरून वृंदावन मंगल कार्यालय येथुन रवाना झालो.माझे पाठोपाठ पाटील साहेब व सापळा पथक हे त्यांचेकडील वाहनाने रवाना झाले मी माझी मोटर सायकल समाज कल्याण सांगली येथे कार्यालयाच्या समोरील पार्कीग मध्ये पार्क करून मी पंच असे समाजकल्याण सांगली कर्यालया मधील पहील्या मझल्यावरील जावुन तेथील कर्मचारी यांना उबाळे साहेब यांचेबाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी ते केबिनमध्ये असलेचे सांगितले. त्यांनतर मी पंच नं 1 शिंदे असे उबाळे साहेब यांचे केबिनमध्ये गेलो त्यावेळी मी त्यांना नमस्कार केला त्यावेळी उबाळे साहेब यांनी मला आत मध्ये बोलावुन घेवुन "काढ.....आणलेत ? " असे विचारले असता मी त्यांना " आणलेले हायत साहेब" असे म्हणुन माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये 40,000/- हजार रूपये अँथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून उबाळे साहेब यांचे समोर धरली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे डावे हाताने स्विकारून "किती आहेत ?" असे विचारले त्यावर मी त्यांना "ठरल्या प्रमाणे चाळीस" आणले असल्याचे सांगुन "आपले बिल होत साहेब आठ लाख बारा हजार होते....आठ लाखाच्या हिशेबान केलेल" असे म्हणाले त्यावेळी उबाळे साहेब यांनी ठीक आहे. असे म्हणुन लाच रक्कम त्यांचे टेबलेचे डावे बाजुचे ड्राव्हर मध्ये ठेवली त्यावर मी त्यांना "येवु" असे विचारले असता त्यांनी "हा" असे म्हणलेने मी व पंच नं 1 त्यांचे केबिनमधुन बाहेर आलो त्यावेळी आमचे पाठोपाठ उबाळे साहेब देखिल बाहेर आले त्यावेळी उबाळे साहेब यांनी सोबतचे पंच नं 1 यांचे बाबत मला विचारणा केली असता मी त्यांना माझा भाऊ असलेचे सांगुन माझी तब्बेत



Scanned with OKEN Scanner

बरोबर नसलेने सोबत आला असलेचे सांगितले. त्यानंतर मी बाहेर येवुन पाटील साहेब यांचे मोबाईलवर "Done" असा एस.एम.एस करून लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला.

लागलीच पाटील साहेब व सापळा पथक माझे जवळ आले व पाटील साहेब यांनी माझे कडील डीजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.14 वाजता काढुन घेवुन बंद करून त्यांचे ताबेत घेवुन मला बाजुला जावुन थांबण्यास सांगितले त्यानंर पाटील साहेब यांनी उबाळे साहेब यांना ताबेत घेतले तसेच त्यांचेकडील 40,000/-रूपये लाच रक्कम पंचा समक्ष ताबेत घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्यया पुर्ण करून सदर ठिकाणी पंचनामा करण्याचे गैरसोयीचे असलेने पुढील सविस्तर पडताळणी, सापळा पुर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कारवाई ही अँन्टीकरप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली.

तरी दि 16.04.2025 रोजीचे 15.42 वा ते 15.58वा च्या पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक श्री नितीन उषा संपत उबाळे, वय 46वर्षे, व्यवसाय- नोकरी- सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सांगली वर्ग 1यांनी त्यांचे कक्षामध्ये आपले स्वताचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैर मार्गाने आमचे संकल्प महीला बचत गट यास सामाज कल्याण विभाग सांगली यांचे मार्फत शासकीय निवासी शाळामधील विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय व विभाग स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल सांगली येथे दि 05.01.2025 ते दि 09.01.2025 या दरम्यान सहभागी अधिकारी कर्मचारी व विद्यार्थी यांना नाष्टा व भोजन पुरविनेचे टेंन्टरचे बिल पारीत केलेचा मोबदला म्हणुन स्वता करीता माझेकडे एकुण बिल रक्कमेच्या 10 टक्के प्रमाणे लाचेची मागणी करून तडजोडी अंती बिल रकमेची 5 टक्के प्रमाणे 40,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दि 17.04.2025 रोजी घेवुन येण्यास सांगितले.

त्यानंतर दि 17.04.2025 रोजी 14.05 वाजता ते 14.14 वा च्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री नितीन उषा संपत उबाळे, वय 46वर्षे, व्यवसाय- नोकरी- सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सांगली वर्ग 1यांनी त्यांचे कक्षामध्ये पंचासमक्ष माझ्या कडून बिल पारीत केलेचा मोबादला म्हणुन 40,000/-रूपये लाच रक्कम स्वता करीता स्विकारली आहे म्हणुन माझी श्री नितीन उषा संपत उबाळे, वय 46वर्षे, व्यवसाय- नोकरी- सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सांगली वर्ग 1 सध्या रा. खरे क्लब हाऊस साफल्य बंगला विश्रामबाग सांगली मुळ रा.लक्ष्मी हौसिंग सोसायटी ट्रँगल चाळीच्या पाठीमागे साखरवाडी ता. फलटण जि. सातारा यांचे विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखित करण्यात आलेला असुन तो प्रिंट काढलेनंतर मी वाचुन पाहीला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष                                         हा दिला वर्दीजबाब

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
SANJAY SHIVAJIRAO MORE
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** PBMAH72651
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Shinde

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY SHIVAJIRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH72651

ठाणे अंमलदार
सांगली शहर पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner